# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(शिक्षण विभाग)
## सर्व शिक्षा अभियान – अपंग समावेशित शिक्षण (IED)

जा. क्र. म.न.पा. / शि.वि. / सशिअ / IED / 2013–14 / 216 दि. 12/02/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

...........................................................................................

...........................................................................................

प्राथ. / उच्च प्राथ / माध्य. शाळा म.न.पा. / जि. प. नागपूर.

विषय :– **अल्पदृष्टी / बहुविकलांग हया विषयावर माहितीसत्र व उपक्रमाची माहिती देणे व जन–जागृती करण्याकरीता आपल्या शाळेतील अपंग मार्गदर्षक "Mentor" म्हणून कार्य करण्याकरीता एक शिक्षक / शिक्षीका निवड करण्याबाबत.**

**संदर्भ** :– मप्राशिप / सशिअ / आईडी / 2013–14 च्या अपंग समावेशित शिक्षण उपक्रम अमंलबजावणी मार्गदर्शक संदर्भ याचिका

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, मुख्याध्यापक / शिक्षकांकरिता अपंग मार्गदर्षक "Mentor" अल्पदृष्टी / बहुविकलांग हया विषयावर माहितीसत्र व समावेशनावर आधारित प्रशिक्षणात खालील आवश्यक घटकांवर उदभोदन करण्यात येईल. जसे विद्यार्थ्यांचा नियमित शाळेत प्रवेश झाल्यानंतर शालेय परिसराशी समायोजन होण्याच्या दृष्टीने पुढील टप्प्यानुसार समावेशन करावे. विद्यार्थ्यांकडे प्रथमता शैक्षणिक दृष्टीकोनातून लक्ष न देता किमान तो इतराशी शालेय परिसरात सहभाग, शालेय प्रार्थनेत सहभाग, वर्गखोलीतील सहभाग, खेळामध्ये सहभाग, सह शालेय उपक्रमांमध्ये सहभाग, मध्यान भोजनातील सहभाग, अध्ययन अध्यापनात सहभागाच्या पध्दती व मूल्यांकन, शैक्षणिक सहाय्यभूत सेवाची गरज काय आहे तसेच अल्पदृष्टी / बहुविकलांग हया विषयावर उपक्रमाची माहिती देणे व जन–जागृती करणे व त्यांना प्रशिक्षण देणे मुख्य उद्दिष्ट आहे.

सर्व शिक्षा अभियान–अपंग समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत 0 ते 18 या मध्ये विशेषतः सेरेब्रल पाल्सी, बहुविकलांग, अस्थिव्यंग व मतीमंद मुलांचा समावेश असून या विद्यार्थ्यांना स्नायू व सांध्याअंतर्गत दोष असल्यामुळे शारिरीक स्थितीवर नियंत्रण नसणे परिणामी अध्ययन अध्यापन किंवा वैयक्तिक प्रशिक्षणाच्या वेळी शारिराची स्थिती टिकून ठेवता येत नाही. तर काही विद्यार्थ्यांना सुलभ अध्यापनासाठी असण्यास बाधा निर्माण होते. तसेच सर्व मुलां–मुलींकरीता आवश्यक असणारे बहुतांश शिक्षक अल्पदृष्टी समस्येबाबत माहिती नसलेले असल्याने हा जागरुकता कार्यकम उपयुक्त ठरेल. त्याकरिता सर्व शिक्षा अभियान–अपंग समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत हया विषयावर नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षकांकरिता तज्ञव्यक्तीं कडून माहिती पुस्तीका व PPT Presentation व्दारे अल्पदृष्टी समस्येबाबत माहिती देण्यात येईल. त्याअनुषंगाने सदर विद्यार्थी दैनंदिन शालेय जीवनात नियीमत सुरक्षितपणे टिकून राहतील याबाबतचा विश्वास शिक्षकांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने अशा विद्यार्थ्यांना शालेय परिसरात व वर्ग अध्ययनाच्या वेळी इतर विद्यार्थ्याप्रमाणे प्रत्येक होणाऱ्या शैक्षणिक उपक्रमात व काही कौशल्यास सहभागी होण्याची समान संधी मिळावी व त्यांच्या भावना प्रत्येक उपक्रमांतील कृतीतून पुर्ण व्हाव्यात. यासाठी सदर विद्यार्थी शैक्षणिक वर्ष 2013–14 मध्ये शाळेत येण्यापुर्वीच शालेय परिसरात व अध्ययन वर्गात सुलभपणे बसण्याची व्यवस्था करण्यासाठी मॉडीफाय चेअर, मॉडीफाय डेस्क व कॉर्नर सिटींग इ. फर्निचर विद्यार्थ्यांच्या गरजेनुरूप मोजमाप घेऊन उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थ्यांना वर्गात बसणे सुलभ आणि सोईचे हाईल. जेणेकरून उपक्रमांतर्गत पालकांची परस्पर पूरक कटीबध्दता टिकून ठेवण्यास मदत होईल. करीता अपंग (विशेष गरजा असणाऱ्या) मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपंग मुलांचा शोध घेवून शैक्षणिक मूल्यमापनाच्या आधारे या मुलांच्या शैक्षणिक पर्यायाची निश्चिती करुन **1) नियमित शाळा 2) स्कुल**

रेडीनेस 3) गृहमार्गदर्शन 4) शिघ्र हस्तक्षेप व व्यवसायिक प्रशिक्षण इ. शैक्षणिक पर्यायी व्यवस्था निश्चित केली आहे. त्या अनुषंगाने या शैक्षणिक सहाय्यभूत सेवांची व्यवस्था करणे अनिवार्य आहे. जसे प्रवास, भत्ता, मदतनीस भत्ता, लो विजन किट, थेरेपी–सेवा, स्पलींट, कॉर्नर सिटींग, मॉडीफाय चेअर, कमोड चेअर, हॅन्ड्रल्स **Academic Adaptive Divices,** लूप इडक्शन, स्पीच ब्रेल बुक, **HXT Bank an CD CD Player,** लार्ज प्रिंट, मॉडीफाय **Academic Examination,** पेपर्स ई. उपक्रमाची अंमलबजावणी करणे अपेक्षीत आहे.

त्याकरीता आपल्या शाळेतील अपंग मार्गदर्शक "Mentor" म्हणून कार्य करण्याकरीता एक शिक्षक / शिक्षीका ची निवड करावी व त्यांना उपक्रमामार्फत प्रशिक्षण देऊन उपक्रमाची यशस्वी अंमल बजावणी करण्याकरीता खालील तक्त्यात माहीती कळविण्यात यावी.

| अ. क्र. | शिक्षक / शिक्षीका चे नाव | शाळेचे नांव | पद | शिक्षकांचे दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |

टिप :– 1) वरील तकत्यातील संपूर्ण माहिती सर्व शिक्षा अभियान कार्यालय, नारंग टावर, सिव्हील लाईन, नागपूर महानगरपालिका, मुख्य कार्यालयाला लागून येथे दि. 30/02/2014, या पूर्वी पोहचणे आवश्यक आहेत.

शिक्षणाधिकारी (माध्य.)
जि.प., नागपूर

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जि.प., नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

प्रतिलिपी :–

1 मा. मुख्य कार्यकारी अधिकरी, जिल्हा परिषद, नागपूर.
2 मा. अपर आयुक्त, म.न.पा., नागपूर.
3 मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
4 लेखाधिकारी, म.न.पा., नागपूर.
5 उपशिक्षणाधिकारी (शहर), जिल्हा परिषद, नागपूर.

अधिक माहितीस्तव :–

1. श्री. अभिजीत राऊत (समन्वयक IED) 9823934070
2. श्री. रितेश दिवे, (विशेष शिक्षक IED) 9673003261
3. श्री. अमोल अंभोरे, (विशेष शिक्षक IED) 9673007944
4. श्री. अतुल नाकाडे, (विशेष शिक्षक IED) 9021867948
5. कु. करुणा वंजारी, (विशेष शिक्षिका IED) 9404080290



शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान